1 4 JUN 2023 पुण्यनगरी


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उद्योग, शिक्षण एकत्र आल्यास देश विश्वगुरू बनेल

## डॉ. उदय निरगुडकर : शिवाजी विद्यापीठाच्या विद्यापीठ व उद्योग संवाद केंद्रातर्फे परिसंवाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

देशाला विश्वगुरू बनवण्यासाठी उद्योग क्षेत्र आणि शिक्षण व्यवस्था एकत्र येणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन भारत सरकारच्या नॅशनल हायड्रो इलेक्ट्रिक पॉवर कार्पोरेशनचे स्वतंत्र संचालक डॉ. उदय निरगुडकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यापीठ व उद्योग संवाद केंद्रातर्फे 'युनिव्हर्सिटी-इंडस्ट्री लिंकेजिस : एम्लॉएबिलिटी अँड आंत्रप्रिन्युअरशिप डेव्हलपमेंट' या विषयावर विद्यापीठ-उद्योग संवादवृद्धीच्या अनुषंगाने विशेष परिसंवादात ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये झालेल्या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विद्यापीठ व उद्योग संवाद केंद्रातर्फे आयोजित विशेष परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. उदय निरगुडकर. सोबत मान्यवर.

यावेळी राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे म्हणाले, विद्यापीठाने उद्योग क्षेत्रास पूरक अभ्यासक्रम आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम मनुष्यबळाचा पुरवठा केल्यास देशाच्या प्रगतीत निश्चित हातभार लागणार आहे.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांनी नोकरीच्या शोधात न राहता स्वतःचा उद्योग कसा निर्माण करता येईल, हे पाहिले पाहिजे. संघर्षमय जीवनामध्ये जगत असताना आपल्याकडे वेगळ्या प्रकारची कौशल्ये असली पाहिजेत. अध्यक्षीय मनोगतामध्ये कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी या वर्षापासून सुरू झालेली आहे. ती पहिल्यांदा पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी सुरू होत आहे.

डॉ. सागर डेळेकर यांनी स्वागत केले. डॉ. शिवलिंगप्पा सपली यांनी आभार मानले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह डॉ. महादेव देशमुख, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सरिता ठकार आदी उपस्थित होते.

महासत्ता

## थोडक्यात

# तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड

कोल्हापूर, ता. १२ (प्रतिनिधी)-

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील स्थापत्य (सिव्हिल) विभागामधून १३ विद्यार्थ्यांची नियुक्ती नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यांमधे झालेली आहे. तंत्रज्ञान अधिविभागाला शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन शिंदे यांचे प्रोसाहन लाभले आहे.

या निवड प्रक्रियेत शुभांगी सगट, महेश शेळके, तुषार रामेकर, मृणाल पाटील, विजय पुंड, समीर बकारकसाब, श्रेयश पाटील, वैभव कुमठेकर, ओंकार निकम, सर्वेश कुंभार, दानिश शेख, आयुष लोणारे, रोहन शिंबरे यांची वेगवेगळ्या कंपनीत निवड झाली आहे. या निवडकामी अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन सपली, विभागाचे प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी गणेश पाटील, व स्थापत्य विभाग प्रमुख प्रा. महेश साळुंखे, प्लेसमेंट प्रतिनिधी प्रा. वैभव कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ विदेशी भाषा अधिविभागातील प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना उद्यापासून प्रवेश सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा अधिविभागातील प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी १५ जूनपासून ऑफलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

बारावी, समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असणारे विद्यार्थी एक वर्ष कालावधीच्या रशियन, जर्मन, जपानी, फ्रेंच, पोर्तुगीज या प्रमाणपत्र अभ्यासक्रमासांठी अर्ज करू शकतात. विद्यापीठाच्या कंझ्युमर स्टोअर्स येथे ऑफलाईन अर्ज उपलब्ध आहेत. विद्यापीठाच्या www. unishivaji. ac.in या संकेतस्थळावरील ॲडमिशन २०२३ या लिंकवर माहिती उपलब्ध आहे. इच्छुकांनी विद्यापीठाच्या विदेशी भाषा अधिविभागात संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पुण्यनगरी

# ‘फिटनेस ट्रेनिंग फॉर ट्रेनर’ कार्यशाळा १६ रोजी

कोल्हापूर : जिल्हा क्रिकेट असोसिएशन व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने ‘फिटनेस ट्रेनिंग फॉर ट्रेनर’ या कार्यशाळेचे आयोजन दि. १६ ते १८ जून या कालावधीमध्ये करण्यात येणार आहे. पुण्याचे तज्ज्ञ प्रशिक्षक महेंद्र गोखले हे मार्गदर्शन करणार आहेत. जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या कार्यालयात दि. १५ जून रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत नाव नोंदवावे, असे आवाहन सचिव केदार गयावळ यांनी केले आहे.

पुढारी

# विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेला ७,४७२ विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्र परीक्षेला मंगळवारी ७ हजार ४७२ विद्यार्थी उपस्थित होते, तर आजअखेर सहा अभ्यासक्रमांचे निकाल परीक्षा विभागाने घोषित केले आहेत. विद्यापीठ मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. मंगळवारी मास्टर ऑफ सायन्स, मास्टर ऑफ कॉमर्स, मास्टर ऑफ आर्टस्, बॅचलर ऑफ लॉ (पाच वर्ष), बॅचलर ऑफ कॉम्प्युटर सायन्स, मास्टर ऑफ आर्टस् (भूगोल), मास्टर ऑफ ड्रॅमेटिक्स, मास्टर ऑफ लायब्ररी सायन्स अँड इन्फॉर्मेशन, मास्टर ऑफ फाईन आर्टस् आदी १८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयांमध्ये सुरळीतपणे झाल्या, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

सकाळ

# केडीसीए, शिवाजी विद्यापीठतर्फे कार्यशाळा

कोल्हापूर : जिल्हा क्रिकेट असोसिएशन व शिवाजी विद्यापीठ यांच्यातर्फे 'फिटनेस ट्रेनिंग फॉर ट्रेनर' या कार्यशाळेचे आयोजन १६ ते १८ जुन दरम्यान करण्यात आले आहे. कार्यशाळेसाठी पुण्याचे प्रशिक्षक महेंद्र गोखले मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यशाळेत सहभागी होणाऱ्यांना प्रमाणपत्र देणेत येणार आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील खेळाडू, प्रशिक्षक, शारीरिक शिक्षक यांच्यासह सहभागी इच्छुकांनी १५ जुन सायंकाळी ६ पर्यंत शिवाजी स्टेडियम येथील कोल्हापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या कार्यालयात नाव नोंदणी करावी, असे संस्थेचे सचिव केदार गयावळ यांनी कळवले आहे.

14 JUN 2023 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षणाचा नवा अध्याय दूरशिक्षणातून!

**कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून अलिप्त राहू नये, अथवा उच्च शिक्षणाचे दरवाजे ज्या विद्यार्थ्यांसाठी बंद होते, अशा विद्यार्थ्यांपर्यंत जाऊन त्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याचे काम दूरशिक्षण पद्धतीने करण्यास सुरुवात झाली. याच धर्तीवर शिवाजी विद्यापीठाने बहिःस्थ पद्धतीने शिक्षण देण्यास सुरुवात केली आणि त्यातूनच शिक्षणाचा नवा अध्याय लिहिला गेला.**

**डॉ. प्रवीण लोंढे**

भारतासारख्या विकसनशील देशामध्ये शिक्षणावर शासन मोठ्या प्रमाणात निधी खर्च करते. प्राथमिक शाळांपासून ते विद्यापीठांपर्यंत सर्व स्तरांवर स्वतंत्र मंत्रालये, अनुदान आयोग अशी मोठी व्यवस्था शिक्षण सर्वदूर पसरण्यासाठी प्रयत्नशील असते. असे असले तरीही अनेक कारणांमुळे शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर गेलेल्यांना शिक्षण मिळणे, त्यांच्यातील कौशल्ये विकसित होणे आवश्यक असते. त्यातून देशाला सजग नागरिक आणि उद्योग क्षेत्राला कुशल मनुष्यबळ मिळते. याचा विचार करूनच सन १९६१ मध्ये भारत सरकारच्या शिक्षणविषयक सल्लागार मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार भारतामध्ये दूरशिक्षण केंद्र सुरू झाले. त्यानुसार शिक्षणतज्ज्ञ डॉ. डी. एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या आयोगाने यावर विचार करून यूजीसीच्या सल्ल्यानुसार दिल्ली विद्यापीठ येथे दूरशिक्षण सुरू केले. पुढे त्याचे नामकरण 'डिस्टन्स एज्युकेशन' असे केले. १९८३ मध्ये डॉ. बी. आर. आंबेडकर मुक्त विद्यापीठ या नावाने आंध्र प्रदेशात, तर १९८५ मध्ये दिल्ली येथे इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ या नावाने दूरशिक्षण देणारी विद्यापीठे स्थापन केली. कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून अलिप्त राहू नये, अथवा उच्च शिक्षणाचे दरवाजे ज्या विद्यार्थ्यांसाठी बंद होती, अशा विद्यार्थ्यांपर्यंत जाऊन त्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याचे काम दूरशिक्षण पद्धतीने करण्यास सुरुवात झाली. याच धर्तीवर शिवाजी विद्यापीठाने बहिःस्थ पद्धतीने शिक्षण देण्यास सुरुवात केली.

आज हा बहिःस्थ विभाग 'दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र' या नावाने ओळखला जातो. या विभागामार्फत मुद्रित अध्ययन साहित्य, दृकश्राव्य साहित्य, अभ्यास केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना संपर्कसत्रे यांसारख्या सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. नवीन शैक्षणिक धोरणानुसार आता दुहेरी पदवीची सोयदेखील करण्यात आली आहे. या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रांतर्गत विद्यार्थ्यांना १२ वेगवेगळ्या अभ्यासक्रमांतर्गत प्रवेश घेता येतो. 'यूजीसी'च्या नवीन नियमानुसार सर्वच्या सर्व अभ्यासक्रमांना मान्यता मिळणारे शिवाजी विद्यापीठ हे महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे विद्यापीठ ठरले आहे. शिवाजी विद्यापीठाची कोल्हापूर, सांगली व सातारा या तीन जिल्ह्यांमध्ये दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची दुर्गम भागासह ८६ अभ्यास केंद्रे, तर सांगली व सातारा येथे २ विभागीय केंद्रे असून दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रांतर्गत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी साध्या, सोप्या भाषेत भरपूर उदाहरणांसह स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे. याआधारे विद्यार्थी आपले दैनंदिन कामकाज करून उच्चशिक्षण घेऊ शकतात. प्रसंगी काही शंका निर्माण झाल्यास तज्ज्ञ प्राध्यापकांकडून त्यांच्या शंकांचे निरसन करून आपले शैक्षणिक भवितव्य उज्ज्वल करू शकतात. नियमित प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी जो अभ्यासक्रम आहे तोच दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षणासाठी असून, दोन्हींच्या परीक्षा एकाच वेळी घेतल्या जातात.

**(लेखक : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामध्ये सहायक प्राध्यापक आहेत)**